जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदानांसाठी मंजूर तरतुदींपैकी ७० टक्के तरतुद वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन आदेश क्रमांक : सकआ २०१७/प्र.क्र.२७१/आस्था २,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०१७.

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.६.२०१७
३) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/नियोजन/उप.प्र.२०१६-१७/ २०१७-१८/का-१३/२१७, दि.२६ मे, २०१७.

शासन आदेश :-

राज्यातील जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद या कार्यालयांचा प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च, पेट्रोल, तेल व इंधन, मोटार वाहन दुरुस्ती इत्यादी बाबींवरील होणारा खर्च लेखाशिर्ष २२२५-०१३-६ मधील उपशिर्ष ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या योजनेत्तर योजनेव्दारे करण्यात येतो. संदर्भाधीन शासन परिपत्रक वित्त विभाग दि.१८.४.२०१७ अन्वये सन २०१६-१७ च्या प्रथम नऊमाहीकरिता (डिसेंबर, २०१७ अखेर) योजनेत्तर अर्थसंकल्पित निधी खर्च करण्याची मर्यादा एकूण वार्षिक तरतूदीच्या ८० टक्के एवढी विहित करण्यात आलेली होती. परंतु, शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि.३०.६.२०१७ अन्वये सन २०१७-१८ मधील महसुली लेख्यातील निधी खर्च करण्याची मर्यादा ७० टक्के एवढी विहीत केलेली आहे.

२. वित्त विभागाच्या दि.१८.४.२०१७ व दि.३०.६.२०१७ च्या परिपत्रकांमध्ये नमूद केलेल्या अटींच्या तसेच, खाली नमुद अटींच्या अधीन राहून सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मागणी क्र. एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, (०२) जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने (०२)(०१) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने, (स्थानिक क्षेत्र) (कोषागारातून देय) (२२२५-०१३-६) ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूद रु.४३,१६,०००/- च्या ७० टक्के म्हणजेच रु.३०,२१,२००/- (अक्षरी रु. तीस लक्ष, एकवीस हजार, दोनशे फक्त) इतकी तरतूद वितरीत करण्यास प्रस्तुत ज्ञापनान्वये मंजूरी देण्यात येत आहे-

१) वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.१८.४.२०१७ व दि.३०.६.२०१७ च्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींचे तसेच राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली व सर्व अटी/ शर्तींचे पालन करण्यात येवून वितरित केलेला सर्व निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी.
२) सदर योजनेच्या वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरिक्षक/ महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नसल्याच्या तसेच योजनेची कोणतीही संक्षिप्त देयके प्रलंबित नसल्याच्या धारणेच्या अधीन राहून सदर निधी वितरीत करण्यात येत आहे.
३) वितरीत निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे विहित मुदतीत सादर करण्यात यावीत. सदर उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याची जबाबदारी आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांची राहील.

४) वितरीत करण्यात आलेल्या निधीचा ताळमेळ घालून, लेखा परिक्षण करुन जर निधी अखर्चित राहणार असेल तर विहित मुदतीत निधी परत करण्यात यावा.

३. प्रस्तुत शासन आदेश वित्त विभागाच्या परिपत्रक दि.१८.४.२०१७ व दि.३०.६.२०१७ अन्वये अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी आहरित करण्यास प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२११३२३१९३६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2017.09.21 13:13:04 +05'30'

(ज्ञा.ल. सुळ)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (पाच प्रती)

२) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा, महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर

३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

५) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

७) वित्त विभाग/ कार्यासन व्यय १४, मंत्रालय, मुंबई.

८) सह सचिव अर्थसंकल्प कक्ष, सा.न्या. व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) निवड नस्ती, आस्था २.